


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# 'शबरी भिलणीचा एल्गार' स्वरूप व सौंदर्य'

- कु. विद्या ना. शेंडे (डेरे)

**प्रस्तावना –**

महाराष्ट्रात जवळपास ४७ आदिवासी जमाती आहेत. त्यांच्या ८० बोलीभाषा अस्तित्त्वात आहेत.[१] प्रामुख्याने ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, बुलढाणा, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांत आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे. भिल्ल, पावरा, मावची, कोकणी, महादेव कोळी, गोंड, माडिया गोंड, भिल्ल, कोरकू, न्याहल यासह अनेक जाती व उपजाती आदिवासीमध्ये येतात. प्रत्येक जमातीची स्वतंत्र भाषाशैली असते.

मराठी साहित्यातील 'नाटक' या साहित्यप्रकाराचा विचार केला तर त्यातून बदलत गेलेल्या समाजाचे चित्रण झालेले दिसते. मानवी भावभावना , स्वभाव यांतील विविध छटांचे दर्शन नाटकांतून घडत असते शिवाय समाजाचेही वास्तव चित्रण नाटकांतून घडत असते. समाजातील बदल नाटकांच्या माध्यमातून मांडण्याची परंपरा फार प्राचीन आहे.

मराठी आदिवासी नाटकांचा इतिहास –

स्वातंत्र्योत्तर कालखंडात आदिवासी नाटकाने मराठी रंगभूमीवर आपले वेगळे स्थान निर्माण केले. काही निवडक नाटके पुढीलप्रमाणे [२] –

१. तंट्या भिल्ल – शं. गो. गुप्ते (१९५३)
२. एकलव्य – विश्वनाथ खैरे (१९७२)
३. आदिलीला – प्रा. रमेश कुबल (१९८६)
४. मरीमाईचा भुत्या – व्ही. आर. पाकलवार (१९९०)
५. कमला – विजय तेंडुलकर (१९८२)
६. लोककथा ७८ – रत्नाकर मतकरी (१९७९)
७. आक्रोश – कुंडलिक केदारी (२००३)
८. व्याकरण – प्रेमानंद गज्वी (२०११)
९. महाबिरसा – प्रा. वामन शेळमाके (२०११)
१०. शबरी भिलणीचा एल्गार – संजय जाईबाई यशवंत (२०२२)

'तंट्याभिल्ला' ने इंग्रजांच्या जुलमी सत्तेविरोधात बंड पुकारले होते. 'एकलव्य' नाटकात एकलव्यावर झालेला अन्याय वर्णिलेला आहे. तर 'आदिलीला' या नाटकात दुष्ट शक्तींचा संहार दाखविण्यासाठी 'बोहाडा

या वारल्यांच्या पारंपरिक कलाप्रकाराचा प्रतिकात्मक वापर केला आहे. 'मरीमाईचा भुत्या' हे वास्तवदर्शी नाटक जंगल अधिकाऱ्याच्या मर्डर केसवर आधारित आहे. 'लोककथा ७८' या नाटकात पहिल्यांदाच मराठी रंगभूमीवर जगनझिलू कोळी या महादेव कोळी जमातीतील बंडखोर नायकाचे जीवन नाटककाराने उभे केले आहे. 'आक्रोश' या नाटकात आरक्षण या विषयावर प्रकाश टाकला आहे. 'आदिवासींचे विस्थापन' या विषयावर आधारीत 'व्याकरण' हे नाटक आहे. थोर आदिवासी आद्य क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवन कार्यावर आधारीत 'महाबिरसा' हे नाटक आहे तर 'शबरी भिलणीचा एल्गार' या नाटकातून आदिवासींची समाजवादी लोकशाही, निसर्गप्रेम. मातृसत्ताक कुटुंबपद्धती व वर्तमानकालीन समाजवास्तव यांचे परिणामकारक चित्र उभे केले आहे.

अशाप्रकारे या नाटकांपैकी 'शबरी भिलणीचा एल्गार' या नाटकाच्या स्वरूप व सौंदर्याचा शोध या शोधनिबंधात घेतला आहे.

**'शबरी भिलणीचा एल्गार' या नाटकातील पात्रे –**

मुळातच 'शबरी भिलणीचा एल्गार' हे मातृसत्ताक संस्कृतीचे नाटक असल्यामुळे या नाटकातील सर्व मुख्य पात्र हे स्त्रीप्रधान आहेत. आक्राणी राज्याची राणी अक्काराणी आणि तिची कन्या शबरी या दोन पात्रांभोवती नाटकाचे कथानक फिरते. अक्काराणीच्या राज्यातील मंत्रिमंडळाचे प्रमुखही स्त्री पात्रच आहेत. असे असले तरी भेदभाव नसणारे ते लोकशाही राज्य आहे. अक्काराणी म्हणतात, " आपल्याकडे मातृसत्ताक कुटुंबव्यवस्था, राज्यव्यवस्था असली तरी स्त्री- पुरुष असा भेदभाव करता येत नाही." ( पृ. क्र. १४ ) देवऋषी, शिबू राजे आणि वेदाचार्य या प्रमुख पात्रांव्यतिरिक्त काही पुरुषपात्रदेखील आहेत. 'शबरी' हे पात्र या नाटकातील मुख्य पात्र आहे. ती देवऋषींच्या आश्रमात लहानाची मोठी होते आणि साहित्य व धर्मशास्त्रातून धर्माचे ज्ञान ती मिळवते. वेदाचार्यांना बॉम्बस्फोटाने उडवल्यानंतर न्यायाधिशांना ती म्हणते, "ज्या वेदाचार्याने - तुमच्या भाषेतील शूर, वीर राजाने आपला राज्यविस्तार आणि धर्मविस्तार करून अनार्यांना, महिलांना धर्माचे गुलाम बनविले या भूमीतील मातृसंस्कृती आणि प्राचीन ग्रंथसंपदा उद्ध्वस्त करून पुरुषप्रधान व्यवस्था लादली, त्या वेदाचार्याला संपविण्यासाठीच मी माझं आयुष्य वेचलं." असे विद्रोहक पात्र शबारीचे आहे.

**कालखंड –**

या नाटकाला प्राचीन कालखंडाची पार्श्वभूमी असली तरी हे नाटक वर्तमानकाळात घडताना दिसते. नंदुरबार जिल्ह्यातील आक्राणी अभयरण्याच्या नावावर काल्पनिक आक्राणी राज्यात हे नाटक घडते. अक्काराणीच्या दरबारातील मंत्रीमंडळ, शबरीचे शिक्षण, देवऋषींचे धर्मशास्त्राचे अध्यापन आणि वेदाचार्यांचा मृत्यू ह्या सर्व घटना रामायण काल ते आताचा आधुनिक काळ म्हणजेच भूतकाळ व वर्तमानकाळातही नाटक घडते.

**भूमिका –**

'शबरी' हे नावच पुरणकाळातील / रामायणकाळातील आहे. मुळात शबरी ही आदिवासी स्त्री होय. पण ती गुलाम म्हणूनच वावरताना दिसते. शबरीवर अनेक कथा लिहिल्या गेल्यात. पण हे पात्र

गुलामगिरीतच होते. ज्या शबरीला धर्मप्रसारकांनी / धर्मरक्षकांनी गुलाब म्हणून वागवले, तिची या आधुनिक काळात विद्रोहाने पेटून उठणारी भूमिका आहे. डॉ. वैजनाथ अनमुलवाड म्हणतात की, " मूळ आदिवासी संस्कृती आणि परकीय आर्य संस्कृती यांच्यातील धार्मिक आणि सांस्कृतिक पातळीवरील अत्यंत टोकाचे संघर्ष हे या नाटकाचे मूळ कथाबीज आहे. प्राचीन काळापासून चालत आलेल्या जातीवादी व धर्मवादी समाजव्यवस्थेने आदिवासींना अनेकप्रकारे त्रास देण्याचा प्रयत्न केला आहे." ३

**घटना व प्रसंग –**

या नाटकातील पहिल्याच अंकातून आदिवासींच्या आधुनिक स्वायत्त मातृसत्ताक राज्यव्यवस्थेचा प्रत्यय येतो. अक्काराणीच्या मंत्रीमंडळातील सर्व सर्व प्रमुख या स्त्रियाच आहेत. 'राणीसाहेबांच्या परवानगीशिवाय कोणालाही दंडकारण्यात प्रवेश नसतो.' या संरक्षणमंत्र्याच्या विधानावर अक्काराणी म्हणते, " मी अक्राणी दंडकारण्याची मातृसत्ताक राणी असले तरी संपूर्ण निर्णय हा मंत्रीमंडळाचा असतो. आपली समूहसंस्कृती आणि समाजवादी लोकशाही व्यवस्था असल्याने व्यक्तिगत महत्त्व किंवा दर्जा दुय्यम आहे." ( पृ. क्र. १२ ) तर ' शबरी नावामागे मोठा इतिहास आहे.' ( पृ. क्र. ४७ ) या देवऋषींच्या विचाराला विरोधात्मक व विद्रोहात्मकरीत्या सार्थ करताना शबरी या नाटकात दिसते.

देवऋषींच्या आश्रमात रामायण, महाभारत, वेद, उपनिषदे, धर्मशास्त्र, धर्मचिकित्सा इ. विषयांचा अभ्यास करताना वेदाचार्यांच्या कार्याचा शबरीला अभिमान वाटतो. पण जसजशी ती मोठी होते आणि धर्माचा अभ्यास करते तसतशी तिला वेदाचार्यांच्या भेटीची ओढ लागते. ही ओढ कशासाठी असते ते तिसऱ्या अंकात समजते. वेदाचार्यांचे ध्येय राज्यविस्तार आणि धर्मप्रसार आहे हे शबरी ओळखून असते. वेदाचार्य शबरीला भेटायला येतात तेव्हा रानमेवा देऊन " यातील कोणताही आंबा मी उष्टा केलेला नाही." ( पृ. क्र. ७३) या वाक्यातून रामायणाच्या शबरीची आठवण करून देते. वेदाचार्यांना बॉम्बस्फोटाने उडविल्यानंतर असे का केले यांचे उत्तर ती न्यायालयात देते. ' वेदाचार्याने, आर्यराजाने सूडाच्या बळावर धर्मप्रसारासाठी प्रदेश जिंकून घेण्यासाठी मूळ निवासी आदिवासींच्या कत्तली केल्या. आर्यांनी लिहिलेल्या ग्रंथांतून आदिवासींना राक्षस, क्रूर, चपट्या नाकाचे दैत्य, असूर अशा उपाध्या देऊन हिणवले.' ( पृ. क्र. ८० )

आणि या सर्वांचा परिपाक म्हणजे शबरीचा एल्गार होय.

**निवेदनपद्धती –**

प्रस्तुत नाटकात तृतीयपुरुषी निवेदन पद्धत वापरलेली असून आत्मनिवेदन पद्धत या नाटकात वापरलेली नाही.

**भाषा –**

प्रस्तुत नाटक जरी आदिवासी जीवनावर आधारीत असले तरी ते आधुनिक काळातील असल्याने ते आधुनिक काळातील असल्याने प्रमाणबोली, डांगाणी, इंग्रजी भाषा वापरली गेली आहे. सगाईच्या कार्यक्रमात

‘ बाहका थोडेजे देतो लेजी रा बेनीले,

निभाडे ना निभाडे .’ ( पृ. क्र. ३१ ) अशी डांगाणी भाषा, तर ‘ वर्ल्ड ट्रेड सेंटर, एल. टी. टी. ई. ( पृ. क्र. ६९ ), मिलॉर्ड, बॉम्बस्फोट ( पृ. क्र. ७७ ) असा इंग्रजी भाषेचा वापर झालेला आहे.

**समारोप –**

अशा रीतीने परंपरेने शबरी नावाने चालत असलेल्या गुलामगिरीला मोडून काढत आणि बंड करत मूळ निवासी आदिवासी आणि आर्यसंस्कृती यांच्यातील विद्रोह म्हणजेच ‘शबरी भिलणीचा एल्गार’ हे नाटक होय.

**निष्कर्ष –**

‘शबरी भिलणीचा एल्गार’ या नाटकाकहा अभ्यास केल्यावर खालील निष्कर्ष काढता येतात.

१. या नाटकात मातृसत्ताक समाजव्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे.
२. या नाटकात आदर्श राज्याची निर्मिती करणाऱ्या आदिवासींची आधुनिक स्वायत्त राज्यव्यवस्था दाखवलेली आहे.
३. एका आदर्श लोकशाही व्यवस्थेत असावीत अशी मंत्रीमंडळे – शिक्षण, पर्यावरण, निसर्ग व मातृसत्ताक पद्धतीचे उदात्तीकरण केलेले दिसते.
४. आदिवासी परंपरा असली तरी शिक्षणाला शबरीने अतिशय महत्त्व दिलेले दिसते.
५. युद्धशास्त्र, पुराणशास्त्र, राजकारण, तत्वज्ञान, मानसशास्त्र इ. विषयांचा चौफेर अभ्यास शबरीने केला आणि म्हणूनच आदिवासींना राक्षस, क्रूर ठरवणाऱ्या वेदाचार्याचा ती वध करते.
६. नाटकातील वेदाचार्य म्हणजेच आर्य राजा किंवा राम. त्यांनी आदिवासींना आपले गुलाम मानले होते, त्यांना बदनाम केले व त्यांच्यावर आरोप केले.
७. वेदाचार्य ही रामाचे प्रतिकात्मक रूप म्हणून इथे दिसतात. ज्यांनी मातृसत्ताक पद्धतीचा विध्वंस करण्याचा प्रयत्न केलेला आहे. कारण पुरुषप्रधान संस्कृतीला स्त्रीप्रधान संस्कृती नकोशी होती. असा एक निष्कर्ष आपण काढू शकतो.
८. रामाने शबरीला गुलाम मानले होते. पण आधुनिक काळातील शबरीला हे मान्य नाही. ज्याने दादो लर्कानरेश्वरला बदनाम केले, शूर्पणखेचे नाक, हात,थाने कापली आणि स्त्रीजातीचा अपमान केला त्या वेदाचार्याचा खात्मा शबरी करते.
९. मूलनिवासी आदिवासींच्या शौर्य व समर्पणाचा मोठा इतिहास आहे आणि निसर्ग, जंगल, संस्कृती यांना जपणाऱ्या व त्यावर प्रेम करणाऱ्या आदिवासींवर परकीयांनी केलेले आक्रमण यामुळे शबरीच्या मनात विद्रोह धगधगत होता.

१०. प्रतिकात्मक रूपातील रामाच्या कुटुंबातील भांडणात रावण, शूर्पणखा व ताटिका यांचा नाहक बळी जातो. यामुळे शबरीच्या भावनांचा उद्रेक होतो आणि ती एल्गार करून पुरुषप्रधान सत्तेला छेद देण्याचा प्रयत्न करते.

**संदर्भ –**


१. महाराष्ट्रातील आदिवासी जमाती – डॉ. गोविंद गारे

२. आदिवासी जीवनावरील आशयसंपन्न मराठी नाटके – प्रा. विकास बापूराव बहुले, फडकी मासिक, १५ एप्रिल – जुलै, २०२१.

३. अहेरचा बदला अहेर – डॉ. वैजनाथ अनमुलवाड, फडकी मासिक – १५ फेब्रुवारी - जुलै २०२१.